# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी**, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र ३६७** **दिनांक: ३०.१२.२०२१**

## ३१ डिसेंबरच्या बंदोबस्ताचे अनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस सज्ज-ओमिक्रॉनचे पार्श्वभूमीवर नवीन वर्षाचे स्वागत साधेपणाने करण्याचे आवाहन.

सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी ३१ डिसेंबर रोजी नागरिकांकडून मोठया प्रमाणात आनंदोत्सव (सेलिब्रेशन) साजरा केला जातो. रात्री ००:०० वाजता नवीन वर्षाचे स्वागतासाठी सामान्य नागरिक व महिलादेखील मोठया प्रमाणात घराबाहेर आलेले असतात. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने संपुर्ण पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उपआयुक्त व सर्व सहा. पोलीस आयुक्त यांचे देखरेखेखाली १६५ पोलीस अधिकारी, ५२८ पोलीस अंमलदार, ९८ होमगार्ड, २ आरसीपी प्लाटून व ०१ एसआरपीएफ ची कंपनी असा मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला असून सदरवेळी धार्मिक व पर्यटन ठिकाणी गस्त, विविध ठिकाणी नाकाबंदी, समुद्रकिनारी तसेच विविध भागामध्ये पोलीसांची विशेष नजर राहणार आहे.

सध्या कोविड-१९ ओमिक्रॉनच्या वाढत्या संसर्गाचा धोका लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या नियमावलीचे पालन करण्यात येते किंवा नाही यावर देखील पोलीसांची करडी नजर असणार आहे. त्याअनुषंगाने बंदीस्त जागेमध्ये जास्तीत जास्त १०० व्यक्ती, मोकळया जागेच्या ठिकाणी २५० किंवा उपस्थिती मर्यादेच्या २५ टक्के यापैकी जी मर्यादा कमी असेल इतकेच लोक उपस्थित राहू शकणार आहेत. तसेच उपहारगृहे ५० टक्के क्षमतेनेच चालू ठेवण्याची परवानगी असून सार्वजनिक ठिकाणी रात्री ०९:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो ०५ पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

सर्व नागरिकांनी शासनाचे निर्देश व कायदयाचे पालन करावे व कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर कृत्य आढळयास पोलीस दलाकडून आवश्यक ती कठोर कारवाई केली जाणार आहे. तथापी वाढत्या ओमिक्रॉन विषाणूचा संसर्ग लक्षात घेता नागरिकांनी नवीन वर्षाचे स्वागत हे साध्या पध्दतीने व महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन करावे याबाबत मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.